Estd.1962
NAAC 'A++' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषय : ऑक्टो./नोंव्हे. 2020 च्या हिवाळी सत्रातील परीक्षाबाबत.**
**(औषधनिर्माणशास्त्र, विधी, व्यवस्थापन, शिक्षणशास्त्र, वास्तुनिर्माणशास्त्र, अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी)**

शैक्षणिक वर्ष 2020–21 मधील ऑक्टो./नोव्हें. 2020 हिवाळी सत्रातील उपरोक्त अभ्यासक्रमाच्या परीक्षा दिनांक 22 मार्च 2021 पासून क्लस्टर महाविद्यालयामार्फत सुरु करण्यात आलेल्या होत्या. तथापि, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/2020/Cr-92/DisM-1, दि. 04.04.2021 चे आदेशानुसार कोरोना विषाणू (कोविड–19) संसर्ग साखळी तोडण्यासाठी प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आलेले असल्याने दि. 06 एप्रिल, 2021 ते दि. 12 एप्रिल, 2021 या कालावधीतील सर्व अभ्यासक्रमाच्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात आलेल्या आहेत. सदर स्थगित करण्यात आलेल्या परीक्षेबाबत खालीलप्रमाणे कळविणेत येत आहे.

1. उपरोक्त व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा क्लस्टर पध्दतीने महाविद्यालय स्तरावर घेण्यात येत आहेत. सदर परीक्षा दि. 15 एप्रिल, 2021 पासून सुरू करण्यात याव्यात. **सदर परीक्षा ऑनलाईन स्वरूपात घेण्यात याव्यात. तसेच कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित रहाणार नाही याची दक्षता संबधीत महाविद्यालयाने घेणेत यावी.**
2. दि. 06 एप्रिल, 2021 ते दि. 12 एप्रिल, 2021 या कालावधीतील स्थगित करण्यात आलेल्या अभ्याक्रमाच्या परीक्षेचे सुधारित वेळापत्रक क्लस्टर महाविद्यालयांनी पुनश्चः जाहीर करण्यात यावे.
3. संपूर्ण राज्यामध्ये शनिवार व रविवार असे दोन दिवस लॉकडाऊन जाहीर केलेले असल्याने सदर दिवशी कोणतीही परीक्षा आयोजित करण्यात येवू नये.

उपरोक्त परीक्षांचे सुधारित सविस्तर वेळापत्रक संबंधीत महाविद्यालयांनी परीक्षार्थींच्या निदर्शनास आणावे.

प्र. संचालक
(परीक्षा व मूल्यमापन मंडळ)

जा. क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/557
दि. 12 APR 2021

प्रत– माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी
1. मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था/अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2. सर्व उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक– परीक्षा विभाग
3. आयटी कक्ष – संबंधीत अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता संगणक प्रणालीतून योग्य ती सुविधा उपलब्ध करून दयावी.
4. परीक्षा विभागातील सर्व संबधित विभाग व अधिकारी – पुढील कार्यवाहीसाठी
5. दूरशिक्षण केंद्र
6. समन्वयक, इंटरनेट कक्ष – संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता
7. जनसंपर्क अधिकारी – प्रसिध्दीकरीता